# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३** **प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक:- १९/१०/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील नगर-कल्याण रोडवरील शिवाजी नगरचे नामकरण **"छत्रपती शिवाजी नगर"** असे नामकरण नाव देणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : मा. नगरसेवक श्री. सचिन चन्द्रशेखर शिंदे, दिनांक **१३/०६/२०२२** ची यादी

उपरोक्त विषयांन्वये विनंती रिपोर्ट कि, अहमदनगर शहरातील नगर-कल्याण रोडवरिल शिवाजी नगरचे नामकरण **"छत्रपती शिवाजी नगर"** असे नामकरण नाव देणे मा. नगरसेवक श्री. सचिन चन्द्रशेखर शिंदे, यांनी यादी देवुन सुचविले आहे.

मा. नगरसेवक श्री. सचिन चन्द्रशेखर शिंदे, यांनी संदर्भिय पत्र देवुन कळविले आहे की, प्रभाग क्रमांक 8 मधील कल्याण परिसरातील माझे वडील कै. चंन्द्रशेखर शिंदे व सर्व नागरीकांच्या वतीने शिवाजी नगरची स्थापना केली तेव्हा सर्वांनी मिळुन परिसराचे नाव शिवाजी नगर असे करण्यात आले. हा परिसर शिवाजीनगर नावाने परिचित आहे. या ठिकाणी भव्य छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे, या परिसराचा शिवाजीनगर असा उल्लेख होत असल्याने त्याऐवजी **"छत्रपती शिवाजी नगर "** असे नाव व्हावे अशी बहुसंख्य नागरीकांची व माझी आपणास अशी विनंती आहे अशी मागणी केली आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्तास,चोकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ अंन्वये मा. महासभेस आहे. सदर यापूर्वी कोणतेही नाव देण्यात आलेले नाही.

तरी अहमदनगर शहरातील नगर- कल्याण रोडवरिल शिवाजी नगरचे नामकरण **"छत्रपती शिवाजी नगर"** असे नामकरण नाव देणे बाबत मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन प्रस्ताव मा महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सादर केला असता मा. आयुक्त यांनी सदरचा प्रस्ताव मा. महासभेकडे पाठविणेस दिनांक १८/०८/२०२२ अंन्वये मान्यता दिलीली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचना अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की. उपअभियंता, सा.बा. वि. यांनी प्रस्तावात नमुद केल्यानुसार विषयांकित भागास यापुर्वी नामकरण झालेले नसल्याने सदर नामकरणास करणेस या कार्यालयाची हरकत नाही असे मत आहे. अ नुसार मान्य करण्यास हरकत नाही.

यावर मा. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मा. महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणेॅस आदेशार्थ सादर.

यावर मा. उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार मा. महासभेपुढे निर्णयासाठी पाठविणेॅस निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा. महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** गावडे मळ्यातील रस्त्यावरील खड्यात मुरुम टाकणे बाबत मागणी केली पण प्रस्ताव मंजूर होत नाही. मुलभूत सोयी तरी नागरिकांना पुरविण्यांत याव्यात.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :** पारखी इंजिनिअर यांना विचारा नगरसेवक निधीतून वॉर्डात मुरुम टाकणेची मागणी केली पण मागणीची दखल घेत नाही. तुम्ही तेथे येवून पहा.

**शहरअभियंता श्री.इथापे :** यापूर्वी शहरातील उपनगरातील रस्त्यावर खड्यात मुरुम टाकणेची मागणी केली ही वस्तुस्थिती आहे. तुमच्या मागणीचा विचार करुन प्रस्ताव मंजूर करुन स्टोअर विभागाकडे दिला आहे. स्टोअर विभागाने 13 नगरसेवकांच्या मुरुम पुरवठयांच्या मागणी दिल्या त्याठिकाणी मुरुम मिळाला तेथे तो टाकला. त्यांच्या प्रभागातही काही ठिकाणी मुरुम टाकला आहे. प्रशासनाला मान्य आहे. त्याची कारणे खुप आहेत. त्या कारणाकडे जायचे नाही. 1 नंबर प्रभाग क्षेत्राने मोठा आहे. जेसीबी ट्रक्टरने मुरुम पसरवीला आहे. जास्तीत जास्त रिस्पॉन्स दिला आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** जुना पिंपळगांव माळवी रोड, तपोवन रोड पर्यंत पुर्ण भागात खड्यात मुरुम टाकला पाहीजे.

**शहरअभियंता श्री.इथापे :** तो रस्ता हद्दीत आल्यापासून डब्ल्यू.बी.एम. झालेला नाही त्या रस्त्यावर आत्तापर्यंत 1 रुपयाही खर्च झालेला नाही. काही रस्ते दुरुस्तीच्या पलिकडे खर्च जात आहे. 3-4 दिवसात खड्डे बुजवितो रस्त्यावरुन जाता येईल तेवढे करतो.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :** तेथे शाळा आहेत हजारो मुले तेथुन जा-ये करतात.

**मा.सभागृह नेता श्री.अशोक बडे :** मला सुध्दा 1 डंपर मुरुम दिला नाही. त्या ठेकेदाराचे

थोडे थोडे पैसे द्या बील अदा करा. म्हणजे तो मुरुम पुरवठा करील.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :** त्याचे बील रिलीफ करा म्हणजे आम्हाला मुरुम मिळेल काही प्रमाणात बील द्या. सभेत जर जनतेचे निर्णय होणार नसतील तर काय उपयोग.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** स्वेच्छा निधीतुन सर्व्हे करुन नगरसेवक स्वेच्छा निधीतुन एस्टीमेट करुन मुरुम टाकुन द्या. तेथेच नाहीतर नगर शहरातील रस्त्यांची भयानक अवस्था आहे. 15 मीटर रोड करायचे आहेत पण पाउस चालू असल्याने काम थांबविले आहे. चौघांचे स्वेच्छा निधीतून एस्टीमेट करुन मुरुम टाका.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** ओढयांचे व मुरुमाचे बाबतीत केंव्हा पुर्तता करणार.

**मा.आयुक्त साहेब :** उपनगरातील मुरुम निधी मागणी मुळे विषय प्रलंबित आहेत संबंधित ठेकेदाराला मी मुरुम द्यायला बांधील करतो. 7 -8 दिवसात मुरुम टाकण्यांत येईल.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** काल बडीसाजन मंगलकार्यालया समोर रस्त्यावर 150 200 लोक घसरुन पडले पण अजुन उपाययोजना केली नाही. लहान मुले महिला या गाडयावर स्लीप झाल्या छत्रपती पुतळा ते चांदणी चौकापर्यंत हीच अवस्था झाली आहे. मी श्री.मिसाळ यांना फोन केला आयुक्तांकडून कुठलिही उपाययोजना केली नाही. दोन तासांनी मिसाळ यांनी गाडी पाठवली सर्व सामान्य मध्यमवर्गीय नगरकर यांचा विचार आपण केला पाहीजे त्यांच्या जिवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. टू व्हीलरवर प्रवास ते करतात याबाबत मा.आयुक्त यांनी निर्णय घ्यावा. महानगरपालिकेचे अग्नीशमनचे वाहनाला प्रेशर पंप पाहीजे दुर्घटना व्हायची वाट पाहू नये. नवीन वाहन ताबडतोब पाठवण्याची व्यवस्था करावी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** आमच्या प्रभागातील एका कॉलनीत नागरिकांची बैठक होती त्या बैठकीत शाळेतील मुल सांगत होते रस्ता व्यवस्थीत करा आम्ही कपडे बॅग मध्ये घेवून जातो. जर शाळेचे कपडे खराब झाले तर ते बदलावे लागतील. शाळेचा युनिफॉर्म सोबत घेवून जातो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** सावेडी नाक्या जवळचा रस्ता मंजूर आहे. का वेठीस धरले जाते पैसे मंजूर आहेत. रस्ता का होत नाही.

**शहरअभियंता श्री.इथापे :** सावेडी नाका ते शुभम मंगल कार्यालय ते पाईपलाईन रोड मंजूर आहे. रासनेनगर ते सोना नगर चौक हा रस्ता केला. रासनेनगर ते शुभम मंगलकार्यालय ते सावेडी नाका पर्यत रस्ता डी.पी.मध्ये 15 मीटर प्रत्यक्षात 13 मीटर मिळतो त्या रस्त्याचे एका बाजुने आर.सी.सी.गटर धरली आहे. परंतु सावेडी नाक्यापासून आत जातो तेथे 6 मीटर पेक्षा कमी रस्ता मिळतो. कमितकमी 13 मीटर जागा मोकळी करुन द्या. आम्ही रस्ता करतो अतिक्रमण काढून डब्ल्यु.बी.एम. रस्ता करतो. दिवसाआड पाउस असल्याने खड्डा बुजविता आला नाही. पाउस उघडला की रस्त्याचे दिपावलीनंतर तो रस्ता किमान 13 मीटर

करण्याचे करु. एक दोन दिवसात खड्डा बुजवितो. रासनेनगर ते प्रेमदान हडको मधील रस्ता राहीला आहे तो 12 मीटर जागेवर मिळत नाही. काही दुकाने व घराचा भाग जातो. त्यामुळे 12 मीटर करता येत नाही. अतिक्रमण काढावे लागेल.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** निधी परत जाईल तो रस्ता लवकर करा.

**शहरअभियंता श्री.इथापे :** पाउस संपल्यानंतर जिथे अडचण नाही. व जे मंजूर आहेत पैसे आहेत ते रस्ते प्राधान्याने करण्यांत येतील.

**मा.श्री.मनोज कोतकर :** केडगांव देवी रस्त्यावरील पुलाजवळील रस्त्यावर आडवी भिंत बांधली आहे. त्याठिकाणी अपघात होवू शकतो पाहणी करुन मार्गी लावा.

**शहरअभियंता श्री.इथापे :** ओढयालगतची जागेचे जोशी मालक आहेत. तत्कालीन आयुक्त यांनी टीडीआर देणेची तयारी दर्शविली होती. जागा मालक टीडीआर घ्यायला तयार नाहीत त्यामुळे त्यावर कार्यवाही झाली नाही.

**मा.श्री.मनोज कोतकर :** ती जागा ताब्यात घेणे व निधी व्यवस्था करणेची कार्यवाही करावी. जोशी टीडीआर घ्यायला तयार आहेत चर्चेला बोलवा.

**शहरअभियंता श्री.इथापे :** सहमतीने जागा द्यायला तयार झाले तर जागा ताब्यात घेवू. अन्यथा जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी लागेल.

**मा.श्री.मनोज कोतकर :** महापौर आपण एकदा पाहणी करावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** मा.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतांना 10 कोटी निधी आला त्याचे काय झाले.

**मा.महापौर मडम :** इथापे उत्तर द्या.

**शहरअभियंता श्री.इथापे :** त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी अहमदनगर महानगरपालिकेला 10 कोटी निधी मंजूर केला. प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. शासनाने कार्यान्वयन यंत्रणा म्हणून सा.बा.विभागाकडे दिला होता सा.बां.विभागाने 3 टेंडर या निधीतुन प्रसिध्द केले त्यापैकी काही 3% 10% काही 29% अबावू मंजूर केले. ज्यामध्ये शहर गावठाण भागातील 13-14 रस्ते होते. अमृत भुयारी गटरचे काम चालू असल्याने ते मागे राहीले. सा.बां.विभागाने एनओसी दिल्या पाणी पुरवठा विभागाने एनओसी दिल्या गेल्या गेले एक ते दीड वर्षापासुन या कामाचा पाठपुरावा करत होतो. तत्कालीन महापौर यांचेकडेही बैठक झाली. तत्कालीन महापौर यांचेकडे बैठक झाली. टेंडर अबावू असल्याने त्यात असा निर्णय झाला की तुमच्याकडे आज जो निधी शिल्लक आहे त्यातुन आम्ही जे रस्ते सांगीतले ते रस्ते पूर्ण करा. उर्वरीत निधीचा निर्णय महासभा घेईल असे कळविण्यांत यावे. चौपाटीकारंजा ते नेता सुभाष चौक, नवीपेठ, नगरवाचनालय, पटवर्धनचौक, तख्तीदरवाजा हा रस्ता करणे संदर्भात मा.महापौर यांचे स्वाक्षरीने पत्र दिले. आम्ही नवीन

निधीतुन पाठपुरावा करत आहोत. त्यांचेकडून हे काम होवू शकले नाही. सण उत्सव आहे. नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागते हि वस्तुस्थिती आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : आपण भाववाढ त्यांना देणार का त्या बाबतीत काय निर्णय घेणार टेंडर रिकॉल करणार का.

**शहरअभियंता श्री.इथापे** : निविदा रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाने टेंडर प्रक्रीया केली आहे. तो निधी राज्य शासनाचा आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : त्याठिकाणी नगरसेवकांना रस्ते सुचविण्याचे अधिकार नाहीत.

**मा.श्री.अविनाश घुले** : तुम्ही पीडब्ल्यूडीला पत्रव्यवहार केला का. आमचा 13 लाख निधी वाया गेला वॉ नं. 11 व 12 वॉर्डातले बहुतेक रस्ते आहेत.

**शहरअभियंता श्री इथापे** : आमची अडचण ही आहे. ज्या कामाची वर्क ऑर्डर झाली आहे त्या कामावर महानगरपालिका निधी वर्ग करु शकत नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे** : आयुक्त साहेब उत्तर द्या.

**मा.महापौर मॅडम** : माझ्याकडे मिटींग घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे** : आपल्या शहराची परिस्थिती खड्डेमय झाली आहे. ब-याच सदस्यांनी उहापोह केला. गणपती व मोहरम मार्गावर मागच्या वर्षी किती खर्च केला.

**शहरअभियंता श्री.इथापे** : अबावू टेंडर दिले नाही एस्टीमेट रेटने दिले आहे. मागच्या आर्थिक वर्षात संपुर्ण शहरात पॅचिंग साठी 35 लाख खर्च झाले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे** : जाधव म्हणुन ठेकेदार आहे. 1 कोटी खर्च झाला अशी माझी माहिती आहे.

**शहरअभियंता श्री.इथापे** : मोहरम मिरवणूक मार्गावर आम्ही राजेंद्र हॉटेल पर्यंत ग्राउटींगचे काम केले पण पावसामुळे काम तात्पुरते केले त्यांचे बील अद्याप केलेले नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** : पॅचिंग वर इतका खर्च करतो त्या ऐवजी नविन रस्ता का करीत नाही. वरवर मलमपट्टी लावायचे काम करु नका. बजेट मधुन रस्ता घ्या. शहराचा मध्य भाग आहे. त्याठिकाणी भुयारी गटार, केबल ठेकेदार काम करुन गेला त्याचे काम नाही का डांबरीकरण करायचे. चार रस्ते चांगले झाले पाहीजे. 160 कोटीची भुयारी गटार योजना आहे. त्याने रस्ते खोदले पाउस उघडला की तुम्ही स्वतः पहा आमच्या व्यथा जाणून घ्या. आमच्या भावना समजून घ्या. नियोजनबध्द काम होत नाही. किती मीटर लाईन खाली टाकली पाहीजे याचे काही निकष पाळले जात नाहीत. एक ठेकेदार दुस-या ठेकेदारास काम देतो. मा.मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांनी 10 कोटी निधी मंजूर केला. आम्हाला नगरसेवक निधी देवू नका त्याऐवजी चार रस्ते घ्या. महापौरांना विनंती की, 50 % बजेट शिल्लक आहे. भुयारी

गटर योजनेचे निधी शिल्लक आहेत त्यात आपला निधी टाका व रस्ते करा. मध्य शहराची फार वाईट परिस्थिती आहे. आम्ही कसे मत मागणार महापौर ताई मध्य शहरात जातीने लक्ष द्या तुम्ही लक्ष घाला. आयुक्त साो यांनी पण आले पाहीजे. ८० टक्के भुयारी गटरचे काम झाले. ८० टक्के अमृतचे काम झाले. आम्हाला विश्वासात घ्या. 10 लाख निधीतुन ठेकेदार काम करीत नाही. निधीच मिळत नाही महापौर ताई. चार रस्ते करा पण चांगले करा.

**मा.महापौर मॅडम** : पाउस कमी होवू द्या.
विषय क्रमांक 13 चे वाचन.

**मा.श्री.कुमार वाकळे** : 13 ते 19 विषय मंजूर करुन टाका.

**मा.श्री.शाम नळकांडे** : विषय क्रमांक 1 चे संदर्भात मला पत्र द्यायचे आहे. कल्याण रोडवरील शिवाजी नगर म्हणण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराज असा विषय मंजूर करावा. रस्ता मंजूर करतांना त्यांचे नावापुढे महापुरुषांचा असा उल्लेख करावा.

**मा.श्री.कुमार वाकळे** : ब-याच नगरसेवकांनी मुरुमाची मागणी केली दिवाळीपुर्वी रस्त्यावर मुरुम टाकुन द्यावा. दिवाळी तरी लोकांची चांगली जाईल रस्त्यावरील खड्यात मुरुम टाकावा. बोल्हेगांव आंबेडकर चौकात मध्येच ड्रेनेज लाईन फुटली आहे. तेथे पाईप उभा केला आहे. तेथे रस्ते खराब आहे त्याठिकाणी मुरुम टाकावा. मागच्या स्थायी समितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे लवकर टेंडर निघावे अशी मागणी होती. प्रशासनाने त्यावर कार्यवाही नाही केली.

**शहरअभियंता श्री.इथापे** : यापुर्वी मागच्या सभेत पण चर्चा झाली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पुर्णाकृती बसविण्याची मागणी होत आहे. त्याठिकाणी हॉटेल सुखसागरचे अतिक्रमण होते. न्यायालयात वाद प्रलंबीत होता नुकताच या केसचा निकाल लागला आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे** : हॉटेलची जागा रिकामी होईपर्यंत पुतळा बसविण्यासाठी ऑर्डर द्या लवकरात लवकर टेंडर मागविणेसाठी बांधकाम विभागाने प्रस्ताव द्या. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणाचे आदेश तात्काळ द्यावेत.

**शहरअभियंता श्री.इथापे** : निविदा प्रक्रीया लवकरच करणार आहोत. प्रोफेसर कॉलनी मागच्या आठ दिवसापुर्वी मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडेस बैठक झाली आहे. पोलीस प्रशासनाने दोनही पुतळयांना ना-हरकत दिली आहे. कला संचालनालयाची परवानगी दिवाळी पर्यंत होईल. सुशोभिकरणाचे अंदाजपत्रक तयार केले. महात्माफुले पुतळयाची प्रोसेस पॅरलली करीत आहोत.

**मा.श्री.कुमार वाकळे** : महात्मा फुले यांच्या पुतळया शेजारी सावित्रीबाई फुले यांचा पुतळा बसविणे बाबत. लवकरात लवकर काम मार्गी लावणेत यावे.

**मा.महापौर महोदय :** पुतळयांची कार्यवाही लवकरात लवकर झाली पाहीजे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** थोर पुरुषांचे नांवापुढे आदराने उल्लेख करावा. नामकरण झालेल्या ठिकाणी महानगरपालिकेने बोर्ड लावावा. रासनेनगर मधील रोडला नांव दिले पण त्या ठिकाणी अद्याप बोर्ड लावला नाही.

**मा.श्री.गणेश कवडे :** अंतविधीच्या ठिकाणचे 10 ओट्यांच्या जाळया राहील्या नाहीत प्रेते ढासळतात. वॉचमनने पत्र दिले आहे. दहन ओटे पुर्ण पणे बांधुन टाका. कोणत्या तरी ठेकेदाराला सांगावे लागणार आहे. त्याठिकाणी गवत खुप वाढले आहे. लाकडे तसेच पडले आहेत. उद्यान विभागाने एक कर्मचारी त्या ठिकाणी दिला पाहीजे. चायना मांजामुळे पक्षी जखमी होतात. सक्रांतीच्या वेळी चायना मांजा विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करावी. ओटे पुर्णपणे नविन करावे लागणार. कोव्हीड झाल्यानंतर हॉस्पीटलमधील मयताचा विधी अमरधाम मध्येच केला जातो. अमरधाममध्ये अंत्यविधीसाठी जागा अपुरी पडते. महानगरपालिकेने हॉस्पीटल वाल्यांना विनंती करावी ज्या गावची व्यक्ती असेल त्या ठिकाणी अंत्यविधी करण्यास नातेवाईकांना सांगावे.

**मा.श्री.महेंद्र गंधे :** मृतदेह जाळण्याच्या जाळया तुटल्या त्याचे फोटो काढले. आतापर्यंत चार कोटी खर्च करुन प्रोफेसर कॉलनी रस्ता केला. शॉपिंग कॉम्प्लेक्स मागे कचरा डंपींग आहे खुप वास येतो त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी. नाहीतर आम्ही आदोलन करु. अमरधाम मध्ये मृतदेहाचे अवयव बाहेर येतात. त्याठिकाणी नविन जाळ्या बसविण्यांत याव्यात.

**शहरअभियंता श्री.इथापे :** शहराची लोकसंख्या वाढली, उपनगरांची लोकसंख्या वाढल्याने अमरधाममध्ये आत्ताची व्यवस्था अपुरी पडत आहे. मा.महापौर, मा.आयुक्त यांनी पाहणी केली टप्प्याटप्याने जाळया वाढवणार आहोत. एका वेळी आठ ते दहा अंत्यविधी करण्याची व्यवस्था करणार आहे. दिवाळी नंतर केशवार्पन करण्याचे ठिकाणी ही काम करण्याचे मंजूर करण्यांत आले आहे. स्टेशन परिसरातील मुलभुत सुविधांचे बजेट प्रोव्हीजन करुन मुलभुत सुविधा देण्याचा प्रयत्न करु.

**शहर अभियंता श्री.इथापे :** दोन जाळयांचे काम दिवाळी झाल्यानंतर करण्याचे नियोजन करु.

**मा.श्री.रामदास आंधळे :** हॉस्पीटल मधील ग्रामीण भागातील मृत व्यक्तीचे अंत्यविधी अमरधाम मध्ये करायचे नाही हे म्हणणे बरोबर नाही.

**मा.श्री.अशोक बडे :** उपनगरातील अमरधाम डेव्हलप करा.

**मा.महापौर महोदय :** विद्युतदाहीनी लवकरात लवकर चालू करावी.

**मा.श्री.मनोज कोतकर :** माईकमधुन आवाज येत नाही सर्व माईक बदलून टाका.

**मा.श्री.गणेश कवडे :** अमरधाममध्ये अंत्यविधीच्या वेळी येणा-या गाड्या गेटवर आडवल्या पाहीजे. दहन ओटयापर्यंत नागरिक गाडया नेतात त्यामुळे अमरधाममध्ये अडचणी येत आहेत.

**इलेक्ट्रीक वायरमन डी.घटमाळ :** माईक सिस्टीम अशी आहे की, एका वेळेस एकाने बोलले तर माईक वर व्यवस्थीत आवाज येतो. एकाच वेळी अनेकजन माईकवर बोलले तर सिस्टीम बंद पडते.

**मा.श्री.सचिन शिंदे :** पुढच्या वेळेस हे सर्व माईक बदलले नाहीतर हे सर्व माईक फोडून टाकू.

**उपायुक्त श्री.डांगे :** प्रोफेसर कॉलनी शॉपिंग कॉम्प्लेक्स मागे घंटा गाडयातुन जमा होणारा कचरा कंटेनरमध्ये डंप करुन डेपोवर नेला जातो. पावसामुळे त्याचा वास येतो. त्याठिकाणी पाहणी करुन वास येणार नाही व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :** सावेडी उपनगरात अमरधामसाठी जागा रिझर्वेशन असेल त्याठिकाणी व्यवस्था झाली तर सध्याचे अमरधाम मध्ये लोड येणार नाही.

**मा.श्री.गणेश कवडे :** त्याठिकाणी गरीब मुले शिक्षण घेतात तो विषय मंजूर करावा.

**मा.श्री.शाम नळकांडे :** विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर मह्रम :** 13 ते 19 विषय मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातील नगर-कल्याण रोडवरील शिवाजी नगरचे **"छत्रपती शिवाजी नगर"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

अनुमोदक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १४ दिनांक:- १९/१०/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.श्री.गणेश भोसले (उपमहापौर,अहमदनगर मनपा) यांनी यादी देवून निलय निकेतन अपार्टमेंट,बुरुडगांव रोड, अहमदनगर या परिसरातील चौकास **"जय मल्हार चौक (फाशीचा खंडोबा)"** नामकरण करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ : श्री.गणेश पुंडलिक भोसले, (उपमहापौर,अहमदनगर मनपा) यांची दि.02/08/2022 रोजीची यादी.

वरिल संदर्भांकित विषयान्वये रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, श्री.गणेश पुंडलिक भोसले (उपमहापौर,अ.नगर मनपा) यांनी यादी देवून निलय निकेतन अपार्टमेंट बुरु डगांव रोड, अहमदनगर या परिसरातील समस्त नागरिकांनी भेट घेवून व सोबत जोडलेले पत्र मला दिलेले आहे. सदरील पत्रामध्ये त्यांनी नमुद केले की, सदरील परिसरातील आमचा रहिवासी पत्ता/चौक कोणता असा प्रश्न पडतो त्यामुळे आम्हाला आमच्या एरियामध्ये फिक्स चौकाचे नामकरण केल्यानंतर त्याप्रमाणे सदर ठिकाणी पत्ता फिक्स होईल. आम्हाला पत्रव्यवहारासाठी आमचे येथील चौकास **"जय मल्हार चौक (फाशीचा खंडोबा)"** असे नामकरण करण्यांस परवानगी मिळावी. असे पत्र दिलेले आहे. बाहेर गावावरुन येणारे नागरीक, नातेवाईक यांना घराचा पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच वेळ वाया जातो. या करीता या चौकास **"जय मल्हार चौक (फाशीचा खंडोबा)"** असे नांव दिल्यास बाहेर गावावरुन येणारे नागरीक व नातेवाईकांना पत्ता शोधण्यास अडचणी येणार नाहीत.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे. 1) कलम 457 मधील अ.क्र.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबींसाठी नियम करता येईल. 2) अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 - रस्त्यांना नांवे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना) क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा ज्या क्रमांकाने ओळखण्यांत येईल ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी निलय निकेतन अपार्टमेंट बुरुडगांव अहमदनगर या परिसरातील चौकास **"जय मल्हार चौक "** असे नांव देण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचनाकार यांचा अभिप्राय की, प्रस्तावित चौकास नामकरणाचा विषय हा चर्चेकरीता तथा निर्णयास्तव मा.महासभेपुढे घेणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. यांचे अभिप्रायानुसार व प्रस्तावित रिपोर्ट मधील अधिनियम तरतुदीनुसार प्रस्ताव निर्णयासाठी मा.महासभा यांचेकडे पाठविणेस सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मा.महासभेपुढे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मा.महासभेकडे निर्णयासाठी पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

**चर्चा :-**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** बुरुडगांव रोड, अहमदनगर या परिसरातील चौकास **"जय मल्हार चौक (फाशीचा खंडोबा) "** नामकरण करण्यांत यावे.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर मह्रम :** प्रस्ताव क्रमांक 14 मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. मा.श्री.गणेश भोसले (उपमहापौर,अहमदनगर मनपा) यांनी यादी देवून मागणी केल्यानुसार निलय निकेतन अपार्टमेंट, बुरुडगांव रोड, अहमदनगर या परिसरातील चौकास **"जय मल्हार चौक (फाशीचा खंडोबा) "** नामकरण नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,

अनुमोदक : मा.सौ.मीना संजय चोपडा,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १५ दिनांक:- १९/१०/२०२२**

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक 16 केडगांव मधील स्वप्ननगर, खाटीक मळा या भागाचे **"छत्रपती संभाजीराजे नगर"** नामकरण करणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : मा.आ.श्री. संग्राम अरुणकाका जगताप साहेब ( विधानसभा सदस्य) यांचे दि.२९/०८/२०२२ ची यादी व श्री गणेश पुंडलिक भोसले (उपमहापौर, अ.नगर मनपा) यांनी यादी देऊन महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १६ केडगाव मधील स्वप्ननगर, खाटीक मळा या परिसरात नविन कॉलन्या, अपार्टमेंट, ट्विन बंगलो तयार होत असुन मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे परंतु या भागाला नाव नसल्यामुळे बाहेर गावावरुन येणारे व शहरातील नातेवाईक, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत.त्यामुळे या भागाला **"छत्रपती संभाजीराजे नगर"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता/ चौक/ सार्वजनिक ठिकाण इत्यादीमध्ये मोडत नसुन तो केडगाव उपनगरांपैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे. 1) कलम 457 मधील अ.क्र.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबींसाठी नियम करता येईल. 2) अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 - रस्त्यांना नांवे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना) क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा ज्या क्रमांकाने ओळखण्यांत येईल ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १६ केडगाव मधील स्वप्ननगर,खाटीक मळा या भागाचे "छत्रपती संभाजीराजे नगर" असे नामाकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित परिसरास यापूर्वी नामकरण झालेले नसल्याने आपल्या स्तरावर पहाणी करुन नामकरण करणेस या विभागाची हरकत नाही असे मत आहे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. यांचे ना हरकत अभिप्रायानुसार व रिपोर्ट मधे नमुद अधिनियम तरतुदीनुसार रिपोर्ट निर्णयास मा.महासभा यांचेकडे पाठविणेस सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्याप्रमाणे मा.महासभेपुढे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ' नुसार मा.महासभेकडे मान्यतेस्तव पाठविण्यास सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** प्रभाग क्रमांक 16 केडगांव मधील स्वप्ननगर, खाटीक मळा या भागाचे **" छत्रपती संभाजी नगर "** नामकरण करण्यांत यावे.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर मडम :** प्रस्ताव क्रमांक 15 मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. प्रभाग क्रमांक 16 केडगांव मधील स्वप्ननगर, खाटीक मळा या भागाचे **" छत्रपती संभाजी नगर "** नामकरण नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,

अनुमोदक : मा.श्री.मनोज शंकर कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १६ दिनांक:- १९/१०/२०२२**

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक 14 मधील सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनीला **"छत्रपती नगर"** नामकरण करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांची दिनांक 13/09/2022 रोजीची यादी.

वरिल संदर्भांकित विषयान्वये रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले (उपमहापौर,अ.नगर मनपा) यांनी यादी देवून महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 14 मधील सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनी येथील आम्ही रहिवासी असून हा भाग सारसनगर अंतर्गत येतो आमचा हा भाग पुर्णपणे निवासी झालेला असुन या भागाला ओळखण्यासाठी अधिकृत नांव नसल्याने पत्रव्यवहार व इतर कागदोपत्री कामांसाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे आमच्या भागाला सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनीला " **छत्रपती नगर** " हे नांव देण्यांत यावे अशी त्यांनी माझ्याकडेस मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता/ चौक/ सार्वजनिक ठिकाण इत्यादीमध्ये मोडत नसुन तो सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनी हा उपनगरांपैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे. 1) कलम 457 मधील अ.क्र.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबींसाठी नियम करता येईल. 2) अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 - रस्त्यांना नांवे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना) क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा ज्या क्रमांकाने ओळखण्यांत येईल ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक 14 मधील सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनीला " **छत्रपती नगर** " असे नामकरण करण्यांस मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडेस पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचनाकार यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नामकरणाचा विषय हा निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवणे उचीत होईल.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. यांचे ना-हरकत अभिप्रायानुसार व प्रस्तावित रिपोर्ट मधील अधिनियम तरतुदीनुसार प्रस्ताव निर्णयासाठी मा.महासभेकडे पाठविणेस सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित ब प्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अ प्रस्तावित केल्यानुसार निर्णयासाठी मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, "अ" मान्य.

---*---

**चर्चा :-**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** प्रभाग क्रमांक 14 सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनीला **"छत्रपती नगर"** नामकरण करण्यांत यावे.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर मह्रम :** प्रस्ताव क्रमांक 16 मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. प्रभाग क्रमांक 14 सारसनगर अंतर्गत बाकलीवाल कॉलनीला **" छत्रपती नगर "** नामकरण नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १७ दिनांक:- १९/१०/२०२२**

**प्रस्तावाचा विषय:**

दैनिक लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दैनिक समाचार, दैनिक लोकमंथन, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक नगरटाईम्स, दैनिक पुण्यनगरी, दैनिक पुढारी, दैनिक महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहिक मखदुम (उर्दु), साप्ताहिक नगरवेध, साप्ताहिक ज्ञानधारा, साप्ताहिक जनसत्ता, साप्ताहिक लोकअंकुर, साप्ताहिक संत नगर टाईम्स,साप्ताहिक पोलीस पेपर यांचे सन २०२०-२०२१ या कालावधीतील बिले मा.महासभेकडे मंजुरीस्तव पाठविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिध्दी विभागा मार्फत शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांमध्ये रोटेशननुसार प्रसिध्द करण्यांत येतात.

दैनिक लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दैनिक समाचार, दैनिक लोकमंथन, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक नगरटाईम्स, दैनिक पुण्यनगरी, दैनिक पुढारी, दैनिक महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहिक मखदुम (उर्दु), साप्ताहिक नगरवेध, साप्ताहिक ज्ञानधारा, साप्ताहिक जनसत्ता, साप्ताहिक लोकअंकुर, साप्ताहिक संत नगर टाईम्स, साप्ताहिक पोलीस पेपर या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या एकुण ६२ जाहीरातींची बिले इकडेस प्राप्त झालेली आहेत. सदर जाहीराती वेळोवेळी मा.उपायुक्त (सा) व उपायुक्त (कर) यांच्या खर्चास दिलेल्या मंजुरीने देण्यात आलेल्या आहेत. सदर जाहीरातींची बिले शासकीय दराने प्राप्त झालेली आहेत. तरी सदर तिबले सन २०२२-२०२३ जाहीरात खर्च ७५,००,०००/- या लेखाशिषकातून खर्ची घालण्यास व रु.११,१४,३०३/- (अक्षरी रक्कम रुपये आकरा लाख चौदा हजार तीनशे तीन मात्र)

सन २०२१-२०२२ लेखाशिर्षक जाहीरात खर्च बजेट तरतूद रु. ४०,००,०००/- एकूण झालेला खर्च रु.३९,९८,८२७/- शिल्लक रु.११७३/-

सदरबाबत संबंधित वृत्तपत्रांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानुसार वरील प्रमाणे ६२ बीले सन (२०२१-२०२२) वर्षातून खर्ची टाकणे करीता लेखा परिक्षणासाठी पाठविले असता मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे मुदतवाढ मागण्या मा.महासभेची मंजुरी शिवाय देता येणार नाही. असा अभिप्राय दिला आहे.

त्यानुसार सदरची बीले अदा करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता मा.महासभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे महासभेकडे पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावित मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.श्री. अशोक बडे :** विषय मंजुर करा.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर मडम :** प्रस्ताव क्रमांक 17 मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. दैनिक लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दैनिक समाचार, दैनिक लोकमंथन, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक नगरटाईम्स, दैनिक पुण्यनगरी, दैनिक पुढारी, दैनिक महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहिक मखदुम (उर्दु), साप्ताहिक नगरवेध, साप्ताहिक ज्ञानधारा, साप्ताहिक जनसत्ता, साप्ताहिक लोकअंकुर, साप्ताहिक संत नगर टाईम्स,साप्ताहिक पोलीस पेपर यांचे सन २०२०-२०२१ या कालावधीतील बिले करण्यांस व बिलांच्या रक्कमांची देयके अदा करण्यास व सदरच्या येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. संबंधित विभाग यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

प्रशासनाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.पुष्पा अनिल बोरुडे,

अनुमोदक : मा.श्री.अशोक किसन बडे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १८ दिनांक:- १९/१०/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** कै.श्री.विजय लक्ष्मण बोधे, मयत बिगारी / वॉचमन यांचे कोव्हीड मुळे मृत्यू झाल्याने त्यांचे उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती देयकास मान्यता बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

१ कर्मचा-याचे नांव : श्री.विजय लक्ष्मण बोधे, वसुली/ बिगारी
२ रुग्णाचे नांव : स्वतः
३ कर्मचा-याशी नाते : --
४ पदनाम : वसुली बिगारी
५ हॉस्पीटलचे नांव : साईदीप एमॅहिंग हेल्थकेअर ॲण्ड रिचाज्र सेंटर, अहमदनगर
६ आंतररुग्ण कालवधी : ०५/०४/२०२१ ते ०३/०५/२०२१

अ)

| औषधाचे खर्च | |
|---|---|
| एकुण खर्च | एकुण खर्चाच्या ९०% |
| १,०३,५९१/- | ९३,२३२/- |

ब)

| | |
|---|---|
| १) वास्तव्याचा खर्च<br>४४,०००/- | वास्तव्याचा खर्चाच्या ९०%<br>३६,९००/- |
| २) बाथरुमसह डबलबेड कक्ष-६०००x९= ५४,०००x ७५% | ४०,५००/- |
| ३) आय.सी.यु.९०००x१३= ११७०००x१००%=१,१७,०००/- | १,१७,०००/- |
| ४) आय.सी.यु.७५००x६= ४५,०००x१००%=४५,०००/- | ४५,०००/- |
| एकुण | २,४२,१००/- |

एकुण खर्च = अ + ब
३,३५,३३२/- = ९३,२३२ + २,४२,१००

कै.विजय लक्ष्मण बोधे, बिगारी / वॉचमन यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती पोटी ॲग्रीम रक्कम रु.५०,०००/- साईदिप हॉस्पीटल यांना अदा करण्यांत आला आहे. त्यांनी सादर केलेले वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती बिलाची एकुण रक्कम रुपये ३,३५,३३२/- अक्षरी रक्कम रुपये तीन लाख पस्तीस हजार तीनशे बत्तीस मात्र इतके असुन ॲग्रीम वजा जाता रक्कम रु.२,८५,२३२/- अक्षरी दोन लाख पंच्चाऐंशी हजार दोनशे बत्तीस मात्र

असून सदर वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती देयकाची मुख्य लेखापरीक्षक व लेखाधिकारी यांचेकडून तपासणी करुन घेवुन संबंधिताच्या वारसास अदा करणेस आदेशार्थ सादर.

लेखाशिर्ष :- वैद्यकीय प्रतीपुर्ती खर्च १०००००००/- (सन २०२२-२०२३)

तरतुद रक्कम :- १०००००००/-

आत्तापर्यंत झालेला खर्च :- ८,२५,६६४/-

उपलब्ध शिल्लक :- ९१,१६,५२४/-

अपेक्षित खर्च :- २,८५,२३२/-

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, अ मधील तपशील भरावा. मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावातील वास्तव्याचा खर्च रु.३९,६००/- असा असून प्रस्तावात रु.३६,९००/- घेतलेला आहे. विभागाने खात्री करुन फेरसादर करावे.

फेरसादर रिपोर्ट आस्थापना दिनांक २७/०६/२०२२ रोजी सादर की,

१ कर्मचा-याचे नांव : श्री.विजय लक्ष्मण बोधे, वसुली/ बिगारी

२ रुग्णाचे नांव : स्वत:

३ कर्मचा-याशी नाते : --

४ पदनाम : वसुली बिगारी

५ हॉस्पीटलचे नांव : साईदीप एमॅहिंग हेल्थकेअर ॲण्ड रिचाज्र सेंटर, अहमदनगर

६ आंतररुग्ण कालवधी : ०५/०४/२०२१ ते ०३/०५/२०२१

अ)

| औषधाचे खर्च | |
|---|---|
| एकुण खर्च | एकुण खर्चाच्या ९०% |
| १,०३,५९१/- | ९३,२३२/- |

ब) रुग्णावर झालेला खर्च

| | |
|---|---|
| १) वास्तव्याचा खर्च<br>४४,०००/- | वास्तव्याचा खर्चाच्या ९०%<br>३९,६००/- |
| २) बाथरुमसह डबलबेड कक्ष-६०००x९= ५४,०००x ७५% | ४०,५००/- |
| ३) आय.सी.यु.९०००x१३= ११७०००x१००%=१,१७,०००/- | १,१७,०००/- |
| ४) आय.सी.यु.७५००x६= ४५,०००x१००%=४५,०००/- | ४५,०००/- (१००%) |
| एकुण | २,३९,४००/- |

एकुण खर्च = अ + ब

३,३२,६१२/- = ९३,२३२ + २,३९,४००

कै.विजय लक्ष्मण बोधे, बिगारी / वॉचमन यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती पोटी ॲग्रीम रक्कम रु.५०,०००/- साईदिप हॉस्पीटल यांना अदा करण्यांत आली आहे. त्यांनी सादर केलेले वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती बिलाची एकुण रक्कम रुपये ३,३२,६३२/- इतके असुन ॲग्रीम वजा जाता रक्कम रु.२,८२,६३२/- अक्षरी दोन

लाख ब्याऐंशी हजार सहाशे बत्तीस मात्र असून सदर वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती देयकाची मुख्य लेखापरीक्षक व लेखाधिकारी यांचेकडून तपासणी करुन घेवुन संबंधिताच्या वारसास अदा करणेस आदेशार्थ सादर.

लेखाशिर्ष :- वैद्यकीय प्रतीपुर्ती खर्च १००००००००/- (सन २०२०-२०२१)

| | |
|---|---|
| तरतुद रक्कम | :- १०००००००/- |
| आत्तापर्यंत झालेला खर्च | :- निरंक |
| उपलब्ध शिल्लक | :- १०००००००/- |
| अपेक्षित खर्च | :- २,८२,६३२/- |

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार एकूण रक्कम रु.३,३५,३३२/- मात्र इतके असून अग्रिम रक्कम रु.५०,०००/- समायोजित करुन उर्वरीत रक्कम रु.२,८५,२३२/- संबंधितास अदा करणेस मान्यतेस्तव सादर. सदर देयक रु.३,३५,३३२/- चे असल्यामुळे उचित प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, सदर प्रकरणात उचित प्राधिकरण कोण आहे ? सादर करा.

यावर आस्थापना विभाग यांचेकडून सादर की, मा.महासभा ठराव क्रमांक ३० दिनांक ०७/१२/२०१६ नुसार रक्कम रुपये तीन लक्षच्या पुढील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबतच्या कर्मचा-यांच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासून मा.आयुक्त महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात यावी. असा ठराव पारीत झालेला आहे.

सबब सदर प्रकरणी मा.महासभा उचित प्राधिकरण असल्याने मा.महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती बिल मंजुरीस्तव मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, यथा प्रस्तावित अ

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

.

**मा. श्री. सचिन शिंदे** : विषय मंजूर करणेत यावा.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर मह्रम :** प्रस्ताव क्रमांक 18 मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी कै.श्री.विजय लक्ष्मण बोधे, मयत बिगारी / वॉचमन यांचे कोव्हीड मुळे मृत्यू झाल्याने त्यांचे उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती देयकाच्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

अनुमोदक : मा.श्री.विजय मोहनराव पठारे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३** **प्रस्ताव क्रमांक : १९** **दिनांक :- १९/१०/२०२२**

**प्रस्तावाचा विषय :-** नालेगांव स.नं.117/2 मधील खुली जागा क्रीडांगणासाठी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.महासभा ठराव क्रमांक 56 दिनांक 18/02/2015

2) विश्वस्त प्रमुख स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अहमदनगर यांचा दिनांक 13/01/2021 व दिनांक 28/12/2021 रोजीचा अर्ज.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये विश्वस्त स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अ.नगर यांनी नालेगांव स.नं.117/2 या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा खेळाचे मैदान या वापरासाठी परवानगी मिळणेबाबत संदर्भ क्रमांक 2 अन्वये विनंती अर्ज केलेला आहे.

विषयांकित नालेगाव स.नं.117/2 ही जमिन शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये रहीवास विभागात असुन या जागेच्या रेखांकनास या कार्यालयाने पत्र क्रं.3323 दिनांक 28/04/2014 अन्वये अंतिम स्वरुपाची मंजुरी देण्यांत आलेली आहे. सदर रेखांकनातील खुली जागेचे क्षेत्र 1533.50 चौ.मी. इतके आहे. सदर खुल्या जागेवर रेखांकन धारकाचे नांव असल्याचे दिसुन येते. सदर खुल्या जागेवर अहमदनगर महानगरपालिकेच्या नावाची नोंद लावण्याची कार्यवाही चालू आहे. (सोबत 7/12 उतारा जोडलेला आहे.)

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक 02/12/2020 रोजीच्या अधिसुचनेव्दारे लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्र.3.4.7 मधील तरतुदी स्पष्ट आहेत. उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार रेखांकनातील खुल्या जागेत अनुज्ञेय असलेले वापरच बंधनकारक आहे.

तथापि मंजुर रेखांकनातील खुली जागा ही त्याच रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असुन ते इतर कोणासही विक्री अथवा भाडयाने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंडाधारकांच्या सामाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.1 नुसार मा.महासभेच्या ठरावान्वये मंजूर रेखांकनातील खुली जागा, उद्याने विकसित करणे देखभाल व दुरुस्ती करणे, खेळण्या बसविणे, लॉन विकसित करणे, बाकडे बसविणे, स्ट्रीट लाईट, पाणी व्यवस्था करणे इत्यादी करीता सामाजिक व स्वयंसेवी संस्था यांनी विकसित करणेसाठी तयारी दर्शविल्यास अशा प्रकारे प्राप्त होणा-या प्रस्तावावर

मा.आयुक्त यांनी निर्णय घेवून कार्यवाही करणेस मा.महासभेने ठराव क्रमांक 56 दिनांक 18/02/2015 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सबब खालील अटींच्या अधिन राहून नालेगांव स.नं.117/2 या जमिनीवरील मंजूर रेखांकनातील अहमदनगर महानगरपालिकेस खरेदीखताने दस्त क्र.2186 दिनांक 23/04/2014 ने हस्तांतरीत केलेली आहे. ती खुली जागा (क्षेत्र 1533.50 चौ.मी.) खेळाचे मैदान विकसित करणेसाठी विश्वस्त प्रमुख स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अ.नगर या संस्थेस परवानगी देण्यास हरकत नाही.

अटी :- 1) विषयांकित खुल्या जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. सदर जागेचा कोणत्याही वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

2) विषयांकित खुल्या जागेचा नियमबाह्य अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकसन परवानगी रद्द करुन खुली जागा महानगरपालिका ताब्यात घेण्यात येईल.

3) सदर रेखांकनातील खुली जागा भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यांत येईल.

4) विषयांकित खुल्या जागा मंजुर रेखांकनातील भुखंडधारकास / नागरिकांस विनामुल्य वापर करुन देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

5) विषयांकित खुल्या जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील.

वर नमुद अटींवर अर्जदार संस्थेस मंजूर रेखांकनातील खुली जागा खेळाचे मैदान विकसित करणेसाठी देणेबाबतचा प्रस्ताव पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, महानगरपालिका यांच्या मालकीचा उतारा सादर करणे.

यावर फेर सादर की,

विषयांकित रेखांकनातील खुल्या जागेचा मनपा मालकी हक्काचा उतारा सोबत सादर केलेला आहे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, सोबतच्या ठरावामधील मुद्दा क्रमांक 26 मध्ये फक्त उद्यान विकसित करणे व देखभाल करणे इत्यादी सहीत नमुद आहेत. अवलोकन करुन स्वयंस्पष्ट अभिप्राय स्पष्ट करणे.

यावर दिनांक 02/02/2022 रोजी फेरसादर रिपोर्ट की,

सोबतच्या ठरावात मुद्दा क्रमांक 26 मध्ये खुली जागा क्रीडांगणासाठी वापरणेसाठी नमुद नाही त्यामुळे सदर संस्थेस खुली जागा क्रीडांगणासाठी देणेसाठी मा.महासभेपुढे सदर

प्रकरण मंजूरीसाठी सादर करणे योग्य होईल. असे मत आहे.

आदेशार्थ सादर तसेच UDCPR मध्ये रेखांकनातील खुल्या जागे मध्ये क्रीडांगण हा वापर अनुज्ञेय आहे. तथापि ठरावातील मुद्दा क्रमांक 26 मध्ये क्रीडांगण वापर नमुद केलेला दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.शाम नळकांडे :** विषय क्रमांक 19 ला मंजूरी देण्यांत यावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :** विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर मह्रम :** नालेगांव स.नं.117/2 मधील खुली जागा क्रीडांगणासाठी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. विश्वस्त स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अ.नगर यांनी नालेगांव स.नं.117/2 या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा खेळाचे मैदान या वापरासाठी देण्यास परवानगी मागीतली आहे. अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव स.नं.117/2 मधील खुली जागेमध्ये नगररचना नियंत्रण, नियमावलीनुसार खेळाचे मैदान अनुज्ञेय आहे. त्याअन्वये संस्थेस सदरची जागा खेळाच्या वापरासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यास ही सभा मान्यता देत आहे..

संबंधित विभागाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

अनुमोदक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३** **प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक:- १९/१०/२०२२**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मूळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधार एकत्रित सुधारित विकास योजना तयार करणेसाठी शासनामार्फत डी.पी.युनिट मागविणे, इरादा जाहीर करणे व नगररचना अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ : श्री.योगेश डी. आरोटे यांचेकडील प्राप्त पत्र दिनांक 25/08/2022 अन्वये.

अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना 1854 साली झालेली असून 30 जून 2003 रोजीपासून अहमदनगर महानगरपालिका म्हणुन कार्यरत असुन मूळ हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/07/2005 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे व दिनांक 22/08/2005 पासून अंमलात आलेला आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेची दिनांक 01 जुलै 1999 रोजी हद्दवाढ झालेली असुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/04/2012 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 05/05/2012 पासून अंमलात आलेला आहे.

सबब अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीतील क्षेत्राचा मंजूर विकास आराखडा अंमलात येवून दिनांक 22/08/2022 रोजी 17 वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्याने शासन निर्देश जा.क्रं.टीपीएस 1810/83 प्र.क्र.2115/2010 नवि-13 दिनांक 02/02/2012 अन्वये ज्या विकास योजना अंमलात येवून 17 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे अशा सर्व नियोजन प्राधिकरणांच्या सुधारीत विकास योजना भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे द्रुतगती पध्दतीने तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-1818/1489/प्र.क्रं.303/18 नवि-13 दिनांक 25/01/2019 शुध्दीपत्रक 17/06/2019 अन्वये निर्गमीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक टीपीएस-1818/1647/प्र.क्रं.252/18 नवि-13 दिनांक 15/10/2018 रोजीच्या शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्द + वाढीव हद्द विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये बदल पडलेला असतो त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करतांना 17 वर्षाचा कालावधी पुर्ण होण्याची तारीख व वर्ष वेगवेगळे असते.

त्यामुळे अशा मुळ वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रीया देखील वेगवेगळया वेळी सुरु करण्यांत येते. मुळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही दोन टप्प्यात करतांना विकास योजना प्रस्तावांचे नियोजन करतेवेळी ब-याच अडचणी येवू शकतात व ते नियोजन देखील योग्य प्रकारे होवू शकत नाही. सबब नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्रात मुळ व वाढीव हद्द अशा दोन भागात विकास योजना मंजूर असल्यास पैकी कोणत्याही एका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुस-या क्षेत्राची विकास योजना देखील त्यासोबतच सुधारीत करणेची कार्यवाही झाल्यास, अशी एकत्रीतपणे विकास योजना सुधारीत करतांना नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होवून विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे होवू शकेल व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्प्यावर आणता येईल या बाबीचा विचार करुन राज्यातील सर्वच नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाचे कलम 154 अन्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

राज्यातील सर्व महानगरपालिका /नगरपरिषदा /नगरपंचायती /विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरणे यांनी क्षेत्रात जर मुळ व वाढीव हद्दे क्षेत्राच्या अशा दोन भागात विकास योजना मंजूर असतील तर अशा मंजूर विकास योजनांपैकी कोणत्याही एका भागाची विकास योजना मंजूर होवून अंमलात आल्याच्या दिनांकापासून 20 वर्षे पुर्ण होण्यापूर्वी 3 वर्षे अगोदर त्या भागांची विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करतांना त्यावेळी नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होवून विकास योजना प्रस्तावांचे नियोजन अधिक चांगल्याप्रकारे करणे शक्य व्हावे व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करण्याची कार्यवाही एकाच टप्प्यावर होण्याच्या दृष्टीने जरी दुस-या भागाची विकास योजना मंजूर होवून अंमलात आल्याच्या दिनांकापासुन कितीही कालावधी झालेला असेल तरीदेखील अशा नियोजन प्राधिकरणांनी संबंधित दोन्ही भागांच्या विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया एकत्रितपणे हाती घ्यावी.

त्याप्रमाणे सदरची कार्यवाही ही खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे आवश्यक असल्याने अहमदनगर महानगरपालिका मे.स्थायी समिती सभा क्रमांक 5 विषय क्रमांक 74 दिनांक 28/12/2020 नुसार कामाची निश्चीती व मंजूरी प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेकरीता विद्यमान जमीन वापर (Existing Land Use) चे सर्व्हेक्षण खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यांत आले असून सदर काम अंतिम टप्प्यात असून अस्तीत्वातील जमीन वापर नकाशा तयार करुन सादर केलेला आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राकरीता सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील सुधारीत योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व सहाय्यक संचालक नगररचना यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत यावा.

सुधारीत विकास योजना तयार करण्याचा महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेव्दारे प्रसिध्द करण्यांत यावा. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना / हरकतींचा विचार, सुधारीत विकास योजना तयार करतांना करण्यांत यावा.

तसेच सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता त्या क्षेत्राचे सुधारीत विकास योजनेचे प्रस्ताव तयार करणेकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. "नगररचना अधिकारी" यांच्या नेमणूकीस मा.सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांची पूर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी व त्यांनी मंजूरी दिल्यानंतर "नगररचना अधिकारी" यांच्या नियुक्तीचे औपचारीक आदेश, आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी पारीत करावे.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने विकास योजना तयार करणेकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागविणे.

त्याअनुषंगाने सदर वरील विषय धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी मा.महासभेपुढे मंजूरीस्तव सादर करणेकरीता आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.श्री.शाम नळकांडे :** कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत काय कार्यवाही केली.

**आस्थापना प्रमुख श्री.साबळे :** सानुग्रह अनुदानचे बील व प्रलंबित बिले अर्थ विभागाकडे पाठविले आहेत.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :** देयक दिली असतील तर आज चेक इशु होतील.

**मा.श्री.मनोज कोतकर :** गेल्या 2-4 महिन्यापासून डेंग्यु, मलेरिया यांचे किती पेशंट आढळले.

**वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे :** डिटेल आकडेवारी आता माझ्याकडे नाही. मागवून घेतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** नगरसेवकांना दरवेळी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. तुम्हाला सात आठ वेळा सांगीतले फवारणी करा. एक दिवस माणुस येतो फवारणी करुन निघून जातो.

**वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे :** 7 आरोग्य केंद्रामध्ये 7 मेडिकल ऑफीसर आहे त्यांचे अॅक्टीव्हीटीचे फोटो टाकतो. सर्व रेकॉर्ड आम्ही दाखवतो. तो शासनातर्फे माता सुरक्षीत घर सुरक्षीत अभियान चालू आहे. व नर्सेस मार्फत घरोघर सर्व्हेक्षण चालू आहे. जेथे पेशंट आढळले त्याठिकाणी उपचार करतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** धूर फवारणी किती दिवसात करता.

**वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे :** ही दैनंदिन प्रोसेस आहे. कंटीन्यू पाउस चालू आहे. ज्या ज्या वेळी माझ्याकडेस तक्रार येते ती तक्रार निवारण केली जाते.

**मा.श्री.मनोज कोतकर :** 1 वर्षापुर्वी मागे फवारणी झाली.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :** नगरच्या डॉक्टरांनी व्हायरस सोडला का.

**मा.श्री.मनोज कोतकर :** महिन्यातुन दोनदा तरी औषध फवारणी प्रत्येक वॉर्डात झाली पाहीजे.

**वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे :** याचे योग्य नियोजन करतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** आधीच्या जुन्या फॉगींग मशिनचे काय झाले.

**वैद्यकीय अधिकारी श्री.बोरगे :** एक मोठी मशीन खराब झाली.

**मा.श्री.मनोज कोतकर :** तुमची सगळया ठिकाणी दादागीरी आहे ती करायची नाही. आमच्या घरचे काम सांगत नाही.

**उपमहापौर श्री.गणेश भोसले :** तुमचे काही प्रश्न असतील ते सोडवू. आज संध्याकाळी तुम्ही व फवारणी टीम कोतकरांकडे जायचे नियोजन करायचे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** नगरसेवकांचे कामे होत नसतील. पुढच्या सभेला नगरसेवक येणार नाही. नगरसेवकांच्या भावना समजून घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :** सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा. अभ्यासाला वेळ द्या.

**मा.श्री.गणेश कवडे :** आम्हाला विषयाबाबत अभ्यास करायचा आहे. विषयाबाबत माहिती घेवू तो पर्यंत विषय स्थगीत ठेवण्यात यावा.

**मा.महापौर मद्यम :** सदस्यांच्या मागणी नुसार त्यांना सदर विषयाबाबत अभ्यास करण्यास वेळ मिळणेसाठी सदरचा विषय स्थगीत ठेवण्यांत येवून पुढच्या सभेमध्ये विषय पुन्हा घेण्यांत यावा.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मूळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधार एकत्रित सुधारित विकास योजना तयार करणेसाठी शासनामार्फत डी.पी.युनिट मागविणे, इरादा जाहीर करणे व नगररचना अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मा.सदस्यांच्या सूचनेनुसार अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा. संबंधित विभागाने ज्या मा.सदस्यांना सदर विषयाबाबत माहिती आवश्यक आहे त्यांना माहिती द्यावी. सदरचा विषय पुढच्या सभेमध्ये घेण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३** **प्रस्ताव क्रमांक : २१** **दिनांक:- १९/१०/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2022 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.लताबाई बलभिम शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2022 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

चर्चा :-

मा.सौ.दिपाली बारस्कर : गावडे मळ्यातील रस्त्यावरील खड्यात मुरुम टाकणे बाबत मागणी केली पण प्रस्ताव मंजूर होत नाही. मुलभूत सोयी तरी नागरिकांना पुरविण्यांत याव्यात.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे : पारखी इंजिनिअर यांना विचारा नगरसेवक निधीतून राज्यात मुरुम टाकणेची मागणी केली पण मागणीची दखल घेत नाही. तुम्ही तेथे येवून पहा.

शहरअभियंता श्री.इथापे : यापूर्वी शहरातील उपनगरातील रस्त्यावर खड्यात मुरुम टाकणेची मागणी केली ही वस्तुस्थिती आहे. तुमच्या मागणीचा विचार करुन प्रस्ताव मंजूर करुन स्टोअर विभागाकडे दिला आहे. स्टोअर विभागाने 13 नगरसेवकांच्या मुरुम पुरवठयांच्या मागणी दिल्या त्याठिकाणी मुरुम मिळाला तेथे तो टाकला. त्यांच्या प्रभागातही काही ठिकाणी मुरुम टाकला आहे. प्रशासनाला मान्य आहे. त्याची कारणे खुप आहेत. त्या कारणाकडे जायचे नाही. 1 नंबर प्रभाग क्षेत्राने मोठा आहे. जेसीबी ट्रक्टरने मुरुम पसरवीला आहे. जास्तीत जास्त रिस्पॉन्स दिला आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर : जुना पिंपळगांव माळवी रोड, तपोवन रोड पर्यंत पुर्ण भागात खड्यात मुरुम टाकला पाहीजे.

शहरअभियंता श्री.इथापे : तो रस्ता हद्दीत आल्यापासून डब्ल्यू.बी.एम. झालेला नाही त्या रस्त्यावर आत्तापर्यंत 1 रुपयाही खर्च झालेला नाही. काही रस्ते दुरुस्तीच्या पलिकडे खर्च जात आहे. 3-4 दिवसात खड्डे बुजवितो रस्त्यावरुन जाता येईल तेवढे करतो.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे : तेथे शाळा आहेत हजारो मुले तेथुन जा-ये करतात.

मा.सभागृह नेता श्री.अशोक बडे : मला सुध्दा 1 डंपर मुरुम दिला नाही. त्या ठेकेदाराचे थोडे थोडे पैसे द्या बील अदा करा. म्हणजे तो मुरुम पुरवठा करील.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे : त्याचे बील रिलीफ करा म्हणजे आम्हाला मुरुम

मिळेल काही प्रमाणात बील द्या. सभेत जर जनतेचे निर्णय होणार नसतील तर काय उपयोग.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : स्वेच्छा निधीतुन सर्व्हे करुन नगरसेवक स्वेच्छा निधीतुन एस्टीमेट करुन मुरुम टाकुन द्या. तेथेच नाहीतर नगर शहरात राज्यांची भयानक अवस्था आहे. 15 मीटर रोड करायचे आहेत पण पाउस चालू असल्याने काम थांबविले आहे. चौघांचे स्वेच्छा निधीतून एस्टीमेट करुन मुरुम टाका.

मा.सौ.दिपाली बारस्कर : ओढयांचे व मुरुमाचे बाबतीत केंव्हा पुर्तता करणार.

मा.आयुक्त साहेब : उपनगरातील मुरुम निधी मागणी मुळे विषय प्रलंबित आहेत संबंधित ठेकेदाराला मी मुरुम द्यायला बांधील करतो. 7 -8 दिवसात मुरुम टाकण्यांत येईल.

मा.श्री.प्रकाश भागानगरे : काल बडीसाजन मंगलकार्यालया समोर रस्त्यावर 150 200 लोक घसरुन पडले पण अजुन उपाययोजना केली नाही. लहान मुले महिला या गाडयावर स्लीप झाल्या छत्रपती पुतळा ते चांदणी चौकापर्यंत हीच अवस्था झाली आहे. मी श्री.मिसाळ यांना फोन केला आयुक्तांकडून कुठलिही उपाययोजना केली नाही. दोन तासांनी मिसाळ यांनी गाडी पाठवली सर्व सामान्य मध्यमवर्गीय नगरकर यांचा विचार आपण केला पाहीजे त्यांच्या जिवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. टू व्हीलरवर प्रवास ते करतात याबाबत मा.आयुक्त यांनी निर्णय घ्यावा. महानगरपालिकेचे अग्नीशमनचे वाहनाला प्रेशर पंप पाहीजे दुर्घटना व्हायची वाट पाहू नये. नवीन वाहन ताबडतोब पाठवण्याची व्यवस्था करावी.

मा.सौ.दिपाली बारस्कर : आमच्या प्रभागातील एका कॉलनीत नागरिकांची बैठक होती त्या बैठकीत शाळेतील मुल सांगत होते रस्ता व्यवस्थीत करा आम्ही कपडे बॅग मध्ये घेवून जातो. जर शाळेचे कपडे खराब झाले तर ते बदलावे लागतील. शाळेचा युनिफॉर्म सोबत घेवून जातो.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : सावेडी नाल्याजवळचा रस्ता मंजूर आहे. का वेठीस धरले जाते पैसे मंजूर आहेत.

शहरअभियंता श्री.इथापे : सावेडी नाका ते शुभम मंगल कार्यालय ते पाईपलाईन रोड मंजूर आहे. रासनेनगर ते सोना नगर चौक हा रस्ता केला. रासनेनगर ते शुभम मंगलकार्यालय ते सावेडी नाका पर्यत रस्ता डी.पी.मध्ये 15 मीटर प्रत्यक्षात 13 मीटर मिळतो त्या रस्त्याचे एका बाजुने आर.सी.सी.गटर धरली आहे. परंतु सावेडी नाल्यापासून आत जातो तेथे 6 मीटर पेक्षा कमी रस्ता मिळतो. कमितकमी 13 मीटर जागा मोकळी करुन द्या. आम्ही रस्ता करतो अतिक्रमण काढून डब्ल्यु.बी.एम. रस्ता करतो. दिवसाआड पाउस असल्याने खड्डा बुजविता आला नाही. पाउस उघडला की रस्त्याचे दिपावलीनंतर तो रस्ता किमान 13 मीटर करण्याचे करु. एक दोन दिवसात खड्डा बुजवितो. रासनेनगर ते प्रेमदान हडको मधील रस्ता राहीला आहे तो 12 मीटर जागेवर मिळत नाही. काही दुकाने व घराचा भाग जातो. त्यामुळे 12 मीटर करता येत नाही. अतिक्रमण काढावे लागेल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : निधी परत जाईल तो रस्ता लवकर करा.

शहरअभियंता श्री.इथापे : पाउस संपल्यानंतर जिथे अडचण नाही. व जे मंजूर आहेत पैसे आहेत ते रस्ते प्राधान्याने करण्यांत येतील.

मा.श्री.मनोज कोतकर : केडगांव देवी रस्त्यावरील पुलाजवळील रस्त्यावर आडवी भिंत बांधली आहे. त्याठिकाणी अपघात होवू शकतो पाहणी करुन मार्गी लावा.

शहरअभियंता श्री.इथापे : ओढयालगतची जागेचे जोशी मालक आहेत. तत्कालीन आयुक्त यांनी टीडीआर देणेची तयारी दर्शविली होती. जागा मालक टीडीआर घ्यायला तयार नाहीत त्यामुळे त्यावर कार्यवाही झाली नाही.

मा.श्री.मनोज कोतकर : ती जागा ताब्यात घेणे व निधी व्यवस्था करणेची कार्यवाही करावी.

मा.श्री.मनोज कोतकर : जोशी टीडीआर घ्यायला तयार आहेत चर्चेला बोलवा.

शहरअभियंता श्री.इथापे : सहमतीने जागा द्यायला तयार झाले तर जागा ताब्यात घेवू. अन्यथा जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी लागेल.

मा.श्री.मनोज कोतकर : महापौर आपण एकदा पाहणी करावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे : मा.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतांना 10 कोटी निधी आला त्याचे काय झाले.

मा.महापौर मॅडम : इथापे उत्तर द्या.

शहरअभियंता श्री.इथापे : त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी अहमदनगर महानगरपालिकेला 10 कोटी निधी मंजूर केला. प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. शासनाने कार्यान्वयन यंत्रणा म्हणून सा.बा.विभागाकडे दिला होता सा.बां.विभागाने 3 टेंडर या निधीतुन प्रसिध्द केले त्यापैकी काही 3% 10% काही 29% अबावू मंजूर केले. ज्यामध्ये शहर गावठाण भागातील 13-14 रस्ते होते. अमृत भुयारी गटरचे काम चालू असल्याने ते मागे राहीले. सा.बां.विभागाने एनओसी दिल्या पाणी पुरवठा विभागाने एनओसी दिल्या गेल्या गेले एक ते दीड वर्षापासुन या कामाचा पाठपुरावा करत होतो. तत्कालीन महापौर यांचेकडेही बैठक झाली. तत्कालीन महापौर यांचेकडे बैठक झाली. टेंडर अबावू असल्याने त्यात असा निर्णय झाला की तुमच्याकडे आज जो निधी शिल्लक आहे त्यातुन आम्ही जे रस्ते सांगीतले ते रस्ते पूर्ण करा. उर्वरीत निधीचा निर्णय महासभा घेईल असे कळविण्यांत यावे. चौपाटीकारंजा ते नेता सुभाष चौक, नवीपेठ, नगरवाचनालय, पटवर्धनचौक, तख्तीदरवाजा हा रस्ता करणे संदर्भात मा.महापौर यांचे स्वाक्षरीने पत्र दिले. आम्ही नवीन निधीतुन पाठपुरावा करत आहोत. त्यांचेकडून हे काम होवू शकले नाही. गणपती सण उत्सव आहे. नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागते हि वस्तुस्थिती आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे : आपण भाववाढ त्यांना देणार का त्या बाबतीत काय निर्णय घेणार टेंडर रिकॉल करणार का.

शहरअभियंता श्री.इथापे : निविदा रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाने टेंडर प्रक्रीया केली आहे. तो निधी राज्य शासनाचा आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे : त्याठिकाणी नगरसेवकांना रस्ते सुचविण्याचे अधिकार नाहीत.

मा.श्री.अविनाश घुले : तुम्ही पीडब्ल्यूडीला पत्रव्यवहार केला का. आमचा 13 लाख निधी वाया गेला वॉ नं. 11 व 12 वॉर्डातले बहुतेक रस्ते आहेत.

शहरअभियंता श्री इथापे : आमची अडचण ही आहे. ज्या कामाची वर्क ऑर्डर झाली आहे त्या कामावर महानगरपालिका निधी वर्ग करु शकत नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे : आयुक्त साहेब उत्तर द्या.

मा.महापौर मॅडम : माझ्याकडे मिटींग घेवू.

मा.श्री.अनिल शिंदे : आपल्या शहराची परिस्थिती खड्डेमय झाली आहे. ब-याच सदस्यांनी उहापोह केला. गणपती व मोहरम मार्गावर मागच्या वर्षी किती खर्च केला.

शहरअभियंता श्री.इथापे : अबावू टेंडर दिले नाही एस्टीमेट रेटने दिले आहे. मागच्या आर्थिक वर्षात संपुर्ण शहरात पॅचिंग साठी 35 लाख खर्च झाले आहेत.

मा.श्री.अनिल शिंदे : जाधव म्हणुन ठेकेदार आहे. 1 कोटी खर्च झाला अशी माझी माहिती आहे.

शहरअभियंता श्री.इथापे : मोहरम मिरवणूक मार्गावर आम्ही राजेंद्र हॉटेल पर्यंत ग्राउटींगचे काम केले पण पावसामुळे काम तात्पुरते केले त्यांचे बील अद्याप केलेले नाही.

मा.श्री.अनिल शिंदे : पॅचिंग वर इतका खर्च करतो त्या ऐवजी नविन रस्ता का करीत नाही. वरवर मलमपट्टी लावायचे काम करु नका. बजेट मधुन रस्ता घ्या. शहराचा मध्य भाग आहे. त्याठिकाणी भुयारी गटार, केबल ठेकेदार काम करुन गेला त्याचे काम नाही का डांबरीकरण करायचे. चार रस्ते चांगले झाले पाहीजे. 160 कोटी भुयारी गटार योजना आहे. त्याने रस्ते खोदले पाउस उघडला की तुम्ही स्वत: पहा आमच्या व्यथा जाणून घ्या. आमच्या भावना समजून घ्या. नियोजनबध्द काम होत नाही. किती मीटर लाईन खाली टाकली पाहीजे याचे काही निकष पाळले जात नाहीत. एक ठेकेदार दुस-या ठेकेदारास काम देतो. मा.मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांनी 10 कोटी निधी मंजूर केला. आम्हाला नगरसेवक निधी देवू नका त्याऐवजी चार रस्ते घ्या. महापौरांना विनंती की, 50 % बजेट शिल्लक आहे. भुयारी गटर योजनेचे निधी शिल्लक आहेत त्यात आपला

निधी टाका व रस्ते करा. मध्य शहराची फार वाईट परिस्थिती आहे. आम्ही कसे मत मागणार महापौर ताई मध्य शहरात जातीने लक्ष द्या तुम्ही लक्ष घाला. आयुक्त सा ो यांनी पण आले पाहीजे. 80 टक्के भुयारी गटरचे काम झाले. 80 टक्के अमृतचे काम झाले. आम्हाला विश्वासात घ्या. 10 लाख निधीतुन ठेकेदार काम करीत नाही. निधीच मिळत नाही महापौर ताई. चार रस्ते करा पण चांगले करा.

मा.महापौर मॅडम : पाउस कमी होवू द्या.

विषय क्रमांक 13 चे वाचन.

मा.श्री.कुमार वाकळे : 13 ते 19 विषय मंजूर करुन टाका.

मा.श्री.सचिन शिंदे : विषय क्रमांक 1 चे संदर्भात मला पत्र द्यायचे आहे. कल्याण रोडवरील शिवाजी नगर म्हणण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराज असा विषय मंजूर करावा. रस्ता मंजूर करतांना त्याचे नावापुढे महापुरुषांचा असा उल्लेख करावा.

मा.श्री.कुमार वाकळे : ब-याच नगरसेवकांनी मुरुमाची मागणी केली दिवाळीपुर्वी रस्त्यावर मुरुम टाकुन द्यावा. दिवाळी तरी लोकांची चांगली जाईल रस्त्यावरील खड्यात मुरुम टाकावा. बोल्हेगांव आंबेडकर चौकात मध्येच ड्रेनेज लाईन फुटली आहे. तेथे पाईप उभा केला आहे. तेथे रस्ते खराब आहे त्याठिकाणी मुरुम टाकावा. मागच्या स्थायी समितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे लवकर टेंडर निघावे अशी मागणी होती. प्रशासनाने त्यावर कार्यवाही नाही केली.

शहरअभियंता श्री.इथापे : यापुर्वी मागच्या सभेत पण चर्चा झाली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पुर्णाकृती बसविण्याची मागणी होत आहे. त्याठिकाणी हॉटेल सुखसागरचे अतिक्रमण होते. न्यायालयात वाद पंलेबीत होता नुकताच या केसचा निकाल लागला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे : हॉटेलची जागा रिकामी होईपर्यंत पुतळा बसविण्यासाठी ऑर्डर द्या लवकरात लवकर टेंडर मागविणेसाठी बांधकाम विभागाने प्रस्ताव द्या. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणाचे आदेश तात्काळ

द्यावेत.

शहरअभियंता श्री.इथापे : निविदा प्रक्रीया लवकरच करणार आहोत. प्रोफेसर कॉलनी मागच्या आठ दिवसापुर्वी मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडस बैठक झाली आहे. पोलीस प्रशासनाने दोनही पुतळयांना ना-हरकत दिली आहे. कला संचालनालयाची परवानगी दिवाळी पर्यंत होईल. सुशोभिकरणाचे अंदाजपत्रक तयार केले. महात्माफुले पुतळयाची प्रोसेस पॅरलली करीत आहोत.

मा.श्री.कुमार वाकळे : महात्मा फुले यांच्या पुतळया शेजारी सावित्रीबाई फुले यांचा पुतळा बसविणे बाबत. लवकरात लवकर काम मार्गी लावणेत यावे.

मा.महापौर मॅडम : पुतळयांची कार्यवाही लवकरात लवकर झाली पाहीजे.

मा.श्री.कुमार वाकळे : थोर पुरुषांचे नांवापुढे आदराने उल्लेख करावा. नामकरण झालेल्या ठिकाणी महानगरपालिकेने बोर्ड लावावा. रासनेनगर मधील रोडला नांव दिले पण त्या ठिकाणी अद्याप बोर्ड लावला नाही.

मा.श्री.गणेश कवडे : अंतविधीच्या ठिकाणचे 10 ओट्यांच्या जाळया राहील्या नाहीत प्रेते ढासळतात. वॉचमनने पत्र दिले आहे. दहन ओटे पुर्ण पणे बांधुन टाका. कोणत्या तरी ठेकेदाराला सांगावे लागणार आहे. त्याठिकाणी गवत खुप वाढले आहे. लाकडे तसेच पडले आहेत. उद्यान विभागाने एक कर्मचारी त्या ठिकाणी दिला पाहीजे. चायना मांजामुळे पक्षी जखमी होतात. सक्रांतीच्या वेळी चायना मांजा विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करावी. ओटे पुर्णपणे नविन करावे लागणार. कोव्हीड झाल्यानंतर हॉस्पीटलमधील मयताचा विधी अमरधाम मध्येच केला जातो. अमरधाममध्ये अंत्यविधीसाठी जागा अपुरी पडते. महानगरपालिकेने हॉस्पीटल वाल्यांना विनंती करावी ज्या गावची व्यक्ती असेल त्या ठिकाणी अंत्यविधी करण्यास नातेवाईकांना सांगावे.

मा.श्री.महेंद्र गंधे : मृतदेह जाळण्याच्या जाळया तुटल्या त्याचे फोटो काढले. आतापर्यंत चार कोटी खर्च करुन प्रोफेसर कॉलनी रस्ता केला. शॉपिंग कॉम्प्लेक्स मागे कचरा डंपींग आहे खुप वास येतो त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी. नाहीतर आम्ही आदोलन करु. अमरधाम मध्ये मृतदेहाचे अवयव बाहेर येतात. त्याठिकाणी नविन जाळ्या बसविण्यांत याव्यात.

शहरअभियंता श्री.इथापे : शहराची लोकसंख्या वाढली, उपनगरांची लोकसंख्या वाढल्याने अमरधाममध्ये आत्ताची व्यवस्था अपुरी पडत आहे. मा.महापौर, मा.आयुक्त यांनी पाहणी केली टप्प्याटप्प्याने जाळया वाढवणार आहोत. एका वेळी आठ ते दहा अंत्यविधी करण्याची व्यवस्था करणार आहे. दिवाळी नंतर केशवार्पन करण्याचे ठिकाणी ही काम करण्याचे मंजूर करण्यांत आले आहे. स्टेशन परिसरातील मुलभुत सुविधांचे बजेट प्रोव्हीजन करुन मुलभुत सुविधा देण्याचा प्रयत्न करु.

शहर अभियंता श्री.इथापे : दोन जाळयांचे काम दिवाळी झाल्यानंतर करण्याचे नियोजन करु.

मा.श्री.रामदास आंधळे : हॉस्पीटल मधील ग्रामीण भागातील मृत व्यक्तीचे अंत्यविधी अमरधाम मध्ये करायचे नाही हे म्हणणे बरोबर नाही.

मा.श्री.अशोक बडे : उपनगरातील अमरधाम डेव्हलप करा.

मा.महापौर मॅडम : विद्युतवाहीनी लवकरात लवकर चालू करावी.

मा.श्री.मनोज कोतकर : माईकमधुन आवाज येत नाही सर्व माईक बदलून टाका.

मा.श्री.गणेश कवडे : अमरधाममध्ये अंत्यविधीच्या वेळी येणा-या गाड्या गेटवर आडवल्या पाहीजे. दहन ओटयापर्यंत नागरिक गाडया नेतात त्यामुळे अमरधाममध्ये अडचणी येत आहेत.

इलेक्ट्रीक वायरमन डी.घटमाळ : माईक सिस्टीम अशी आहे की, एका वेळेस एकाने बोलले तर माईक वर व्यवस्थीत आवाज येतो. एकाच वेळी अनेकजन माईकवर बोलले तर सिस्टीम बंद पडते.

मा.श्री.सचिन शिंदे : पुढच्या वेळेस हे सर्व माईक बदलले नाहीतर हे सर्व माईक फोडून टाकू.

उपायुक्त श्री.डांगे : प्रोफेसर कॉलनी शॉपिंग कॉम्प्लेक्स मागे घंटा गाडयातुन जमा होणारा कचरा कंटेनरमध्ये डंप करुन डेपोवर नेला जातो. पावसामुळे त्याचा वास येतो. त्याठिकाणी पाहणी करुन वास येणार नाही व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेवू.

मा.श्री.कुमार वाकळे : सावेडी उपनगरात अमरधामसाठी जागा रिझर्वेशन असेल त्याठिकाणी व्यवस्था झाली तर सध्याचे अमरधाम मध्ये लोड येणार नाही.

मा.श्री.गणेश कवडे : त्याठिकाणी गरीब मुले शिक्षण घेतात तो विषय मंजूर करावा.

मा.महापौर मह्रम : 13 ते 19 विषय मंजूर.

मा.श्री.शाम नळकांडे : कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत काय कार्यवाही केली.

आस्थापना प्रमुख श्री.साबळे : सानुग्रह अनुदानचे बील व प्रलंबित बिले अर्थ विभागाकडे पाठविले आहेत.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे : देयक दिली असतील तर आज चेक इशु होतील.

मा.श्री.मनोज कोतकर : गेल्या 2-4 महिन्यापासून डेंग्यु, मलेरिया यांचे किती पेशंट आढळले.

डॉ.श्री.बोरगे : डिटेल आकडेवारी आता माझ्याकडे नाही. मागवून घेतो.

मा.श्री.मनोज कोतकर : नगरसेवकांना दरवेळी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. तुम्हाला सात आठ वेळा सांगीतले फवारणी करा. एक दिवस माणुस येतो फवारणी करुन निघून जातो.

डॉ.श्री.बोरगे : 7 आरोग्य केंद्रामध्ये 7 मेडिकल ऑफीसर आहे त्यांचे अॅक्टीव्हीटीचे फोटो टाकतो. सर्व रेकॉर्ड आम्ही दाखवतो. तो शासनातर्फे माता सुरक्षीत घर सुरक्षीत अभियान चालू आहे. व नर्सेस मार्फत घरोघर सर्व्हेक्षण चालू आहे. जेथे पेशंट आढळले त्याठिकाणी उपचार करतो.

मा.श्री.मनोज कोतकर : धूर फवारणी किती दिवसात करता.

डॉ.श्री.बोरगे : ही दैनंदिन प्रोसेस आहे. कंटीन्यू पाउस चालू आहे. ज्या ज्या वेळी माझ्याकडेस तक्रार येते ती तक्रार निवारण केली जाते.

मा.श्री.मनोज कोतकर : 1 वर्षापुर्वी मागे फवारणी झाली.

मा.श्री.स्वप्नील शिंदे : नगरच्या डॉक्टरांनी व्हायरस सोडला का.

मा.श्री.मनोज कोतकर : महिन्यातुन दोनदा तरी औषध फवारणी प्रत्येक वॉर्डात झाली पाहीजे.

डॉ.श्री.बोरगे : याचे योग्य नियोजन करतो.

मा.श्री.मनोज कोतकर : आधीच्या जुन्या फॉगींग मशिनचे काय झाले.

डॉ.श्री.बोरगे : एक मोठी मशीन खराब झाली.

मा.श्री.मनोज कोतकर : तुमची सगळया ठिकाणी दादागीरी आहे ती करायची नाही. आमच्या घरचे काम सांगत नाही.

उपमहापौर श्री.गणेश भोसले : तुमचे काही प्रश्न असतील ते सोडवू. आज संध्याकाळी तुम्ही व फवारणी टीम कोतकरांकडे जायचे नियोजन करायचे.

मा.श्री.अनिल शिंदे : नगरसेवकांचे कामे होत नसतील. पुढच्या सभेला नगरसेवक येणार नाही. नगरसेवकांच्या भावना समजून घ्या.

विषय क्रमांक 20 चे वाचन

मा.श्री.कुमार वाकळे : सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा. अभ्यासाला वेळ द्या.

मा.श्री.गणेश कवडे : आम्हाला विषयाबाबत अभ्यास करायचा आहे. विषयाबाबत माहिती घेवू तो पर्यंत विषय स्थगीत ठेवण्यात यावा.

मा.महापौर मडम : सदस्यांच्या मागणी नुसार त्यांना सदर विषयाबाबत अभ्यास करण्यासाठी वेळ मिळणेसाठी सदर विषय स्थगीत ठेवण्यांत येत आहे.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.

जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक : १३ / १० /२०२२

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १९-१०-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | |
|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |

कार्यालय,

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ५) | श्रीमती.निकम, नगरसचिव कार्यालय | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी व एक कर्मचारी यांची गणवेशासह नियुक्ती करणेत यावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०३, सोमवार दि. १०/१०/२०२२ रोजी होणा-या**

**सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.गोंटला | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर | |
| ३ | श्री.आकाश घुले | |
| ४ | श्री.बाबा कोतकर | |

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक :- १३/१०/२०२२.

प्रति,

१) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता
२) श्री.राउत , सामान्य प्रशासन विभाग,
३) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
४) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय
५) श्री.आकाश घुले, सभागृह नेता कार्यालय,
६) श्री.बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
७) श्री.राजु दळवी, उपायुक्त कार्यालय,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १९-१०-२०२२ अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपण सकाळी ९.३० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या

कार्यवाहीसाठी.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा अनुक्रमे सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १९-१०-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार **दिनांक १९-१०-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : /११/२०२२.

विषय : बुधवार दिनांक - १९ / १० /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९७६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ बुधवार दिनांक १९/१०/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.८,२६०/- (अक्षरी रक्कम रुपये आठ हजार दोनशे साठ फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या* **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.